# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/ ६९३२ /२०१७ पुणे शहर, दिनांक - ०१.०९.२०१७

**विषय :- बकरी ईद निमीत्त करण्यात आलेल्या वाहतूक व्यवस्थेबाबत.**

---

दिनांक ०२.०९.२०१७ रोजी बकरी ईद साजरी होणार आहे. त्या निमीत्त मुस्लीम बांधव एकत्र येऊन आप-आपल्या मोहल्यातील मशिद व ईदगाह मैदानावर / सार्वजनिक ठिकाणी सामूहीक नमाज पठण करून ईद साजरी करतात. त्यावेळी ईदगाहचे जवळपास मोठया प्रमाणावर वाहनांची गर्दी होते. सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अशोक मोराळे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

गोळीबार मैदान, ईदगाह या ठिकाणी दिनांक ०२.९.२०१७ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून नमाज पठण पुर्ण होई पर्यंत **मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान चौक ते ढोले पाटील (सेव्हन लव्हज) चौक** दरम्यानची वाहतूक सर्व प्रकारच्या वाहनांसाठी आवश्यकते नुसार बंद करण्यात येणार आहे. नमूद रस्त्यावरील वाहन चालकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा येणे-जाणेसाठी वापर करावा.

१. मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान चौक ते सेव्हन लव्हज चौकाकडे येताना भैरोबानाला - लुल्लानगर चौक - गंगाधाम चौक - वखार महामंडळ - गिरिधर भवन चौक - सेव्हन लव्हज व पुढे इच्छित स्थळी जावे.

२. सेव्हन लव्हज चौकाकडून गोळीबार मैदान चौकाकडे जाणा-या वाहनचालकांनी सेव्हन लव्हज चौक - गिरिधर भवन चौक - वखार महामंडळ चौक - गंगाधाम चौक - लुल्लानगर चौक व पुढे इच्छित स्थळी जावे किंवा डायस प्लॉट मार्गे / गिरिधर भवन चौकातून सॅलसबरी पार्क रोड मार्गे सरळ सी.डी.ओ. चौकातून उजवीकडे वळून लुल्लानगर मार्गे किंवा खटाव बंगला चौकातून उजवीकडे वळून नेपीअर रोड व लॉरेन्स रोडने तालाब पार्क पासून मम्मादेवी चौक मार्गे इच्छित स्थळी जावे.

याखेरीज शहरातील अन्य भागात उदा. खडकी बाझार, रेंजहिल्स् एच टाईप मैदान, खडकी, चऱ्होलीगांव चिंचवड गांव, गव्हाणेवस्ती, भोसरी, वेल्फेर दारूल कमिटी, भोसरी, हांडेवाडी रोड, हडपसर, घोरपडी बाझार मैदान, डायमंड कपनी, मुंढवा इ. ठिकाणचे ईदगाह मैदानावर नमाज पठण होणार असल्याने सदर भागातील वाहतूकीचे परिस्थितीनुसार तेथील वाहतूक बंद अथवा अन्य मार्गाने वळविण्यात येईल, तरी वाहन चालकांनी पोलीसांना सहकार्य करून संभाव्य गैरसोय टाळावी.